Estd. 1972

DOMBIVLI SHIKSHAN PRASARAK MANDAL

# DOMBIVLI SHIKSHAN PRASARAK MANDAL

(Regd. No. MAH / 301 / Thane F-222, Thane Pub. Trust Act)

**Shri. Prabhakar Desai**
Chief Promoter

**Dr. U. P. Prabhakar Rao**
Founder Chairman

Sp. Plot No. 4, Opp. MIDC Office, K. V. Pendharkar College, Dombivli (E), Dist. Thane - 421 203.
Tel. Off.: 2800631 E-Mail : dspmandal222@gmail.com

दि. ०३-०६-२०२४

सर्व विद्यार्थी, पालक वर्ग आणि डोंबिवलीतील सर्व नागरिक यांस,

**विषय : प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित केल्या जाणाऱ्या चुकीच्या बातम्यांबाबत**

आपणा सर्वांना कळविण्यात येत आहे की, शासनाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार काही विषय (Major आणि Minor) कमी झाले आहेत. परंतु डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के. व्ही. पेंढरकर कला, विज्ञान आणि वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या प्रगतीस पोषक असे काही नवीन विषयदेखील सुरु केले आहेत. **त्यामुळे मंडळाने कुठलेही शिक्षण बंद केलेले नाही व आधी सुरु असलेले शिक्षण पूर्ववत चालू राहील याची आम्ही ग्वाही देत आहोत. तसेच महाविद्यालय जरी पूर्णतः विना-अनुदानित तत्त्वावर चालविण्याचे ठरवले असले तरीदेखील विद्यार्थ्यांच्या फीमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही याची आपण सर्वांनी विशेषकरून नोंद घ्यावी.**

प्रसार माध्यमाद्वारे व्यवस्थापनावर केलेले आरोप पूर्णपणे चुकीचे असून उलट मंडळ विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा पुरवण्यासाठी अनेक पावले उचलत आहेत, जसे डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाने डॉ. यु. प्रभाकर राव स्पोर्ट्स अकॅडमीची स्थापना करून सर्व विद्यार्थ्यांना व नागरिकांना खेळाची दालने सवलतीच्या दरात खुली करून दिली आहेत.

**तरी सर्व पालक व विद्यार्थ्यांना आम्ही नम्रपणे आवाहन करीत आहोत की, प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित होत असलेल्या चुकीच्या बातम्यांकडे आपण दुर्लक्ष करावे व अफवांना बळी पडू नये.**

Shikshan Prasarak Mandal Dombivli (E) Dombivli

(डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळ)